# इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को – ऑप. बँक लि., मुंबई

आयकर भवन, महर्षी कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.

## १७ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दि इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. मुंबई या बँकेची ९७ व्या अधिमंडळाची वार्षिक सभा बुधवार, १४ सप्टेंबर, २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता आयकर भवन, महर्षी कर्वे मार्ग, चर्चगेट, मुंबई कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात (शामीयानामध्ये), मुंबई ४०० ०२० येथे आयोजित करण्यात आली होती. सदरच्या बैठकीला नियोजित वेळेत गणसंख्या नसल्यामुळे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांनी उपविधी क्र. ३३(१) नुसार , गणसंख्ये अभावी बैठक अर्ध्या तासाकरिता तहकूब करण्यात येत आहे तसेच सदर बैठक अर्ध्या तासानंतर ठीक ३.३० वाजता पुन्हा याच ठिकाणी सुरू करण्यात येईल व त्यावेळी सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही असे सभागृहास कळविले.

गणसंख्ये अभावी अर्ध्यातासाकरीता तहकूब करण्यात आलेले सभेचे कामकाज ठीक ३.३०वाजता सुरू झाले. सभा सुरू होते वेळी २६८ सभासद उपस्थित होते. बँकेचे मुख्यकार्यकारी यांनी सर्व संचालकांना मंचावर स्थानापन्न होण्याची विनंती केली. त्यानंतर बँकेचे मा. कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांना विनंती केली की, त्यांनी बँकेचे उपाध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांना मंचावर घेऊन यावे.

संचालक मा. श्री. प्रमोद वाघे यांनी सभेच्या सुरूवातीस बँकेचे उपाध्यक्ष , कार्याध्यक्ष सर्व संचालक, बँकेचे सभासद व कर्मचारी वृंद यांचे शब्दसुमनाने स्वागत केले व बँकेच्या पदसिध्द अध्यक्षा श्रीमती गीता रविचंद्रन मॅडम ह्या त्यांच्या व्यस्त कार्यबाहुल्यामुळे सभेस उपस्थित राहू शकणार नाहीत असे कळविले. त्यामुळे आजच्या सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद बँकेचे मा. उपाध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी स्विकारावे अशी त्यांना विनंती केली. त्यास मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी अनुमोदन दिले. मा. उपाध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी अध्यक्षस्थान स्विकारल्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे व बँकेचे मा. कार्याध्यक्ष श्री. रुपेश बेसेकर यांनी दिप प्रज्वलन करून सभेची सुरूवात केली.

मा. कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सभेचे अध्यक्ष श्री. तळपदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले, तसेच माननीय संचालक श्री. एकनाथ अभंग यांनी बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बँकेचे संचालक श्री. रवी शंकर यांनी बँकचे उपाकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सभेच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरूवात करण्यापूवी मागील वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर आज पर्यंत दिवंगत आजी माजी सभासदानां २ मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

बँकेच्या पदसिध्द अध्यक्षा श्रीमती गीता रविचंद्रन मॅडम या सभेला उपस्थित राहू शकल्या नाहीत. परंतू त्यांनी वार्षिक बैठकीच्या निमित्ताने बँकेच्या सभासदांकरिता पाठविलेला संदेश मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी सभेत वाचून दाखविला. त्यांनी आपल्या संदेशाव्दारे बँकेच्या कामकाजा विषयी समाधान व्यक्त केले व भविष्यातही बँकेच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहो अशी आशा व्यक्त करीत बँकेला व सभासदांना शुभेच्छा दिल्यात.

बँकेचे मा. कार्याध्यक्ष श्री. रूपेश नामदेवराव बेसेकर यांनी आपल्या मनोगतामधून मागील आर्थिक वर्ष २०२२–२३ या वर्षातील बँकेच्या कामगिरीच्या आढावा सभासदांपुढे मांडला. बँकेच्या सर्व्हीस प्रोव्हायडरमध्ये बदल करण्यात आला असल्याने आपल्या बँकेकडून दिल्या जाणाऱ्या सेवेत आमुलाग्र बदल होईल असे मनोगतामध्ये नमूद केले. तसेच बँकेची मोबाईल सेवा लवकरात लवकर सुरू करण्यात येईल .त्याचप्रमाणे मोबाईल बँकींग सेवेची सुरुवात



THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *

झाल्यानंतर लवकरच UPI आधारीत व्यवहाराची सेवा सुरु करण्यात येईल याबद्यल सभासदाना आश्वासन दिले. त्याचप्रमाणे बँकेच्या प्रगतीकरिता बँकेचे सभासद, कर्जदार, जामीनदार यांची महत्वाची भूमिका असून त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला.

सभेचे अध्यक्ष व बँकेचे उपाध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सभागृहाला संबोधित करतांना त्यांना बँकेच्या उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी दिल्याबद्दल पदसिध्द अध्यक्षा मॅडम व संचालक मंडळाचे आभार मानले. बँकेने सभासदांना आधुनिक सोयी उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले. आजची सभा ही खेळीमेळीच्या वातावरणात व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपल्या बँकेसाठी ज्या महत्वाच्या सूचना असतील त्यावर व्यापक चर्चा व्हावी अशी त्यांनी सभासदांना विनंती केली.तद्नंतर बँकेचे संचालक श्री.प्रमोद वाघे यांनी सभेचे सूत्र सभेचे अध्यक्ष श्री.शीतल तळपदे यांच्या कडे सोपवितांना सभागृहास सूचित केले की, अध्यक्षांच्या निर्देशानूसार व कार्यसूचीनुसार सभेचे कामकाज होईल. यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. तळपदे साहेब यांनी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जाधव यांना सभेच्या नोटीसचे वाचन करण्यास सांगितले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जाधव यांनी नोटीसचे विषयसूचीनुसार वाचन केले व अहवालातील मुद्रणदोषाबाबत सभागृहाला माहिती देताना पान क्रमाक२३ वर Balance with other Banks अनु. क्र. (iii), व (iv) ऐवजी (iv) व (v) वाचावे, Other Investments अंतर्गत "FD with PMC Bank" ही शब्द रचना चुकीने छापण्यात आलेली असून ती गाळण्यात आली असे समजावे, पान क्रमाक२९ "Other Assets Total करीता अधोरखीत करणे आवश्यक, पान क्रमाक ३० वर Provision for Investment Fluctuation Reserve ऐवजी Provision for Investment Depreciation Reserve असे वाचावे, पान क्रमाक ३४ वर Schedule 12, Cash अनु. क्र. (v), (vi), (vii) ऐवजी (i) (ii) (iii) असे वाचावे,Schedule 13, Balance with other Banks, Current Depost अनु. क्र. (iii), (iv), ऐवजी(iv) (v) असे वाचावे, Fixed Deposits अनु. क्र. (iv), (vii) (xii), (xiii), (xiv) ऐवजी (i),(ii)(iii) (iv) (v) असे वाचावे, Schedule 15, Innovative Perpetual Debts Instrument FD with PMC Bank ऐवजी Equity Warrant of Unity Small Finance Bank असे वाचावे. Schedule 17 Advances, Long Term Loan अनु. क्र. (a),(b)() (b) (c) (d) (f)ऐवजी (a), (b) (c), (d) (e), (f), (g), (h) असे वाचावे.

सभासद श्री. प्रमोद दहाट यांनी ९७ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याबाबत विषय सुचिवर विषय ठेवण्यात आला नाही असे निदर्शनास आणून दिले. यावर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जाधव यांनी महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मध्ये शासनाने बदल करुन तसा अध्यादेश जारी केल्याने तो विषय वगळण्यात आला असे स्पष्ट केले.व त्यांच्या शंकेचे निरसन केले. त्यानंतर विषयसूचीनुसार सभेस सुरूवात करण्यात आली.

**विषय क्र. १:– दि. २४.०८.२०२२ रोजी झालेल्या ९६ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सभागृहास असे सूचित केले की, बँकेच्या ९६ व्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या इतिवृत्ताचे वाचन बँकेचे मा. कार्याध्यक्ष श्री मा.संदीप आंबोकर.संचालक श्री. एकनाथ अभंग, संचालक, श्री. संग्राम



THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

मुंडे,, व संचालक श्री. संजय कांबळे करतील. यावर मा. कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सभागृहाला विचारणा केली की, इतिवृत्ताची प्रत सर्वांना वितरीत करण्यात आली आहे तसेच संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे या उपरांत इतिवृत्ताचे सभागृहापुढे वाचन करायचे कि इतिवृत्ताचे वाचन झाले समजुन पुढील कार्यवाही करायची. यावर सभागृहाने इतिवटत्त वाचन करण्याची आवश्यकता नसून त्याचे वाचन झाले असे समजण्यास मंजुरी दिली. तदनंतर इतिवृत्ता संबंधी काही हरकती, सुचना, दुरूस्ती माजुन पुढील कार्यवाहीस सुरूवात करण्यात आली. त्यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सदर इतिवृत्ताचे वाचन झाले असे समजून सदर प्रस्ताव मंजुरीकरिता सभागृहापुढे ठेवला. ९६ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्त मंजूरीचा ठराव मांडला व त्यास सभागृहाने मंजूरी दिली व खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. १:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, दिनांक २४ ऑगष्ट २०२२ रोजी झालेल्या ९६ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत ही सभा मंजूर करीत आहे.

सुचक : श्री. रूपेश आंबेकर
अनुमोदकः श्री. अनिल बाबुराव पाटील
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. २:– दि. १४.१२.२०२२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी सभागृहास असे सूचित केले की, बँकेच्या दिनांक १४.१२.२०२२ रोजी **वैधानिक लेखापरिक्षक ाच्या फेरनिवडीबाबत घेण्यात** आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताचे वाचन संचालक श्री. प्रमोद वाघे करतील. सदर इतिवृत्ताचे वाचन संचालक श्री. प्रमोद वाघे यांनी केले व सदरच्या इतिवृत्ताबाबत मंजुरीकरिता प्रस्ताव सभागृहापुढे ठेवला व त्यास सभागृहाने मंजूरी देण्यात आली. त्यानूसार खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. २:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. ची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, दिनांक १४ डिसेंबर २०२२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत ही सभा मंजूर करीत आहे.

सुचक : श्री. अंकुश भारगुडे
अनुमोदकः श्री. प्रकाश संभाजी डोळस
ठराव सर्वानुमते मंजूर

THE INCOME-TAX DEPT. CO-OP BANK LTD. SEAL MUMBAI

**विषय क्र. ३:– दि. ३१ मार्च, २०२३ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल, अंतर्गत व संविधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले ताळेबंद व नफा–तोटा पत्रके स्विकृत करणे.**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार विषय क्र. ३ सभागृहापुढे मांडला व मा. संचालक श्री. संग्राम मुंडे यांना सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर वाचुन मंजूरीकरीता ठेवण्याचे निर्देश दिले. त्यावर विचारविनिमय करून बँकेची नफा क्षमता विचारात घेता अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले ताळेबंद व नफातोटा पत्रक यास मा. संचालक मंडळाने मंजूरी दिली असल्याने ते स्विकृत करण्यातबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले व त्यानूसार खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ३:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. ची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी संपलेल्या सहकार वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, अंतर्गत व संविधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा–पत्रक ही सभा स्विकृत करीत आहे.

सुचक : श्री. मित्रजीत एस कांबळे
अनुमोदकः श्री. प्रभाकर विठ्ठल कदम
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ४ :– सन २०२२–२३ या सहकार वर्षामध्ये बँकेला झालेल्या नफा विभागणी संबंधी संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करून मंजूरी देणे व लाभांश जाहिर करणे.**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. संजय कांबळे यांना सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर वाचुन मंजूरीकरीता ठेवण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मा. संचालक श्री. संजय कांबळे यांनी संचालक मंडळाने मंजूर केलेल्या आर्थिक वर्ष सन २०२२–२३ च्या नफा विभागणीस कार्योत्तर मंजूरी देण्यास व जाहिर लाभांश मंजूर करणेबाबत मा. सभागृहास विनंती केली. बँकेला एकूण रू.१,५६,००,३५९.४३ एवढा अहवाल साली नफा झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा रू.२,७८३.३० त्यामध्ये जमा करिता, विभागणीस रू.१,५६,०३,१४२.७३ एवढा नफा शिल्लक असल्याचे सूचित केले. संचालक मंडळाने आवश्यक त्या आर्थिक तरतुदी केलेल्या असून संचालक मंडळाने १५%दराने लाभांशवितरणाकरिता केलेली शिफारस मंजूर करण्याबाबत सभागृहास विनंती केली.

यावर श्री. प्रमोद दहाट यांनी प्रस्तावित लाभांश टक्केवारीत वाढ करण्याची मागणी केली व इतर सदस्यांनी त्याचे समर्थन केले. लाभांश वाढीच्या मागणीवर स्पष्ट करण्यात आले की, आर्थिक तरतुदी, निकष, बँकींग व्यवसायातील इतर गोष्टींचा विचार करता प्रस्तावित १५ टक्के लाभांश योग्य प्रमाणात असून त्यात वाढ करणे उचित होणार नाही.त्याचप्रमाणे आपल्या बँकेचे कर्ज दर कमी असून देवीवर व्याजदर चांगल्या प्रकारे देतो. हा सभासदांचा अप्रत्यक्ष फायदाच आहे. १५ टक्के लाभांश सहकार क्षेत्राच्या अभ्यासानुसार उच्चतम दराने आपण वितरीत करतो आहे व त्यात वाढ करणेची मागणी उचित होणार नाही असे कळविले.



THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. * MUMBAI * SEAL

वरील सर्व बाबींचा विचार करिता सभागृहाने संचालकांनी शिफारस केलेला १५% लाभांश जाहिर करण्यात मंजूरी दिली व नफा विभागणीबाबत मंजूरी दिल्याने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ४:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. ची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे मागील वर्षाचा शिल्लक नफा रू.२,७८३.३० व अहवाल साली झालेला नफा रू. १,५६,००,३५९.४३ मिळून रू.१,५६,०३,१४२.७३ एवढया एकूण नफ्याच्या विभागणीस खालीलप्रमाणे ही सभा मंजूरी देत आहे.

| तपशील | रूपये |
|---|---|
| राखीव निधी (नफ्याच्या २५%) | ३९,००,७८६.०० |
| लाभांश १५% | ५०,०४,०००.०० |
| विकास निधी | २०,००,०००.०० |
| सर्वसाधारण निधी | १०,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १०,००,०००.०० |
| लाभांश समानीकरण निधी २% | ३,१२,०६३.०० |
| सार्वजनिक निधी | ७,२५,०००.०० |
| शिक्षण निधी १ % | १,५६,०००.०० |
| शतक महोत्सव निधी | १५,००,०००.०० |
| शिल्लक नफा | ५,२९३.७३ |
| एकूण | १,५६,०३,१४२.७३ |

सुचक : श्री. रविंद्र भास्कर पालांडे
अनुमोदकः श्री. कृष्णा के.गोडसे.
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ५:–सन २०२२–२३ सालाचा संविधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि अंतर्गत हिशेब तपासनिसांचा अहवाल वाचून स्विकृत करणे.**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. रवी शंकर यांना सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर वाचुन मंजूरीकरीता ठेवण्याचे निर्देश दिले. बँकेचे लेखापरिक्षक मे. साज अँड असोसिएटस्, चार्टर्ड अकाऊंटंट यांनी सन २०२२–२३ सालाचा संविधानिक लेखापरिक्षण अहवाल सादर केला. तसेच सन २०२२–२३ सालाचे अंतर्गत हिशेब तपासनीसाचे काम मे. प्रशांत मित्तल अँड कंपनी एल.एल.पी. चार्टड अकाऊंटंट यांनी पूर्ण करून तसा अहवाल सादर केला आहे. तरी सभागृहाने तो स्विकृत करावा अशी मा. संचालक श्री. रवी शंकर यांनी सभागृहास विनंती केली. सदर विषयाबाबत सर्वसाधारण सभेने विचार विनिमय करून सन २०२२–२३ या वर्षाचा संविधानिक

THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

लेखापरिक्षण अहवाल आणि सन २०२२–२३ चा अंतर्गत हिशेब तपासनिसांचा अहवाल स्विकृत करण्यास सभागृहाने मंजूरी दिली. त्यानुसार स्विकृतीबाबतचा खालील ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ५:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. ची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि,, सन २०२२–२३ या वर्षाचा संविधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि अंतर्गत हिशेब तपासनिसांचा सादर करण्यात आलेल्या अहवालास ही सभा स्विकृती देत आहे.

सुचक : श्री. संतोष बाळकृष्ण कळमकर
अनुमोदक: श्री. संजय रमेश कोळी
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ६:– सन २०२४–२५ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. अरूण घाडीगावकर यांना सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर वाचुन मंजूरीकरीता ठेवण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मा. संचालक श्री. अरूण घाडीगावकर यांनी विषयसुचीनुसार सन २०२४–२५ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याबाबत सभागृहाला विनंती केली. सदरबाबत अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने सन २०२४–२५ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यास व त्यांचा मेहनताना ठरविण्यास मा. संचालक मंडळास अधिकार प्रदान केले व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ६:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. ची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि,सन २०२४–२५ सालासाठी अंतर्ग त हिशेब तपासणीसाठी लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याबाबत ही सभा माननीय संचालक मंडळास अधिकार प्रदान करीत आहे.

सुचक : श्री. विजय झगडे
अनुमोदक: श्री. गोविंद गायकवाड
ठराव सर्वानुमते मंजूर

THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL MUMBAI

**विषय क्र ७:–भारतीय रिझर्व बँकेने दिनांक २७.०४.२०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२३–२४ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणेबाबत माननीय संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे.**

भारतीय रिझर्व बँकेने दिः २७.०४.२०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२३–२४ साठी वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेबाबत माननीय संचालक मंडळाने शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नेमणूकीबाबतच्या भारतीय रिझर्व बँकेकडे पाठवलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी विषय क्र. ७ संबंधीत ठराव सभागृहासमोर मंजूरीकरीता ठेवला.मा. उपकार्याध्यक्ष श्री. संदीप आंबोकर यांनी विषयसूचीनूसार सहकार आयुक्त कार्यालयाने सहकारी संस्थांच्या लेखापरिक्षणासाठी तयार केलेल्या लेखापरिक्षकांच्या शासनमान्य नामतालिकेमधून आर्थिक वर्ष २०२३–२४ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मा. संचालक मंडळाने बँकेस प्राप्त अर्जामधून मे. साज अँण्ड असोसिएटस् चार्टर्ड अकाऊंटट यांनी मागिल वर्षाचे वैधानिकपरिक्षण केले असल्याने त्यांची रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांच्याकडे मा.संचालकमंडळाच्या सभेत मंजुरी घेऊन प्रस्ताव पाठविण्यात आला त्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी अशी सभागृहास विनंती केली. त्यावर विचार विनिमय करून आर्थिक वर्ष २०२३–२४ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. साज अँण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकाऊंटट यांच्या फेर नेमणूकीबाबतच्या भारतीय रिझर्व बँकेकडे पाठवलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत ठरविण्यात आले. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ७:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. ची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि,भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक २७.०४.२०२१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशानुसार आर्थिक वर्ष २०२३–२४ साठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणेबाबत शासनाने निश्चित केलेल्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून मे. साज अँण्ड असोसिएटस्, चार्टर्ड आकाऊंटट यांची वैधानिक लेखापरिक्षक म्हणून फेर नेमणूक करणेबाबत भारतीय रिझर्व बँकेस पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सुचक : श्री. प्रमोद दहाट
अनुमोदकः श्री. प्रकाश संभाजी डोळस
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र ८:– आर्थिक वर्ष २०२१–२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणे.**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. राजेंद्र भागवत यांना सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर वाचुन मंजूरीकरीता ठेवण्याचे निर्देश दिले. बँकेचे मा. संचालक श्री. राजेंद्र भागवत यांनी आर्थिक वर्ष २०२१–२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणेबाबत वार्षिक सर्वसाधारण सभेस विनंती केली. बँकेने सन २०२१–२२ च्या वैधानिक दोष दुरूस्ती अहवालाबाबत कायदेशीर कार्य वाही पूर्ण केलेली असल्याने त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली त्यानूसार खालील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *

**ठराव क्र. ८:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, आर्थिक वर्ष २०२१–२२ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरूस्ती अहवालास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक : श्री. रुपेश सदानंद आंबेकर
अनुमोदक : श्री.रविंद्र राजाराम गुरव
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ९:– बँकेच्या सन २०२२–२३ च्या मंजूर अंदाजपत्रका पेक्षा बाबनिहाय जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच सन २०२३–२४ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे. (तपशिल अहवालाच्या परिशिष्ट २ मध्ये दिलेला अहवालाच्या परिशिष्ट २ मध्ये दिलेला आहे.)**

सदर विषय चर्चेला घेतांना सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी केलेल्या सुचनेनूसार मा. संचालक श्री. एकनाथ अभंग यांना सदर विषयाशी संबंधीत ठराव सभागृहासमोर वाचुन मंजूरीकरीता ठेवण्याचे निर्देश दिले. माननीय संचालक मंडळाने सन २०२३–२४ सालाकरीता तयार केलेल्या व अहवालात प्रसिध्द केलेल्या अंदाजपत्रकास कार्योत्तर देणे तसेच सन २०२२–२३ साली झालेल्या अतिरिक्त खर्चास मंजूरी देण्याबाबत मा. संचालक श्री. एकनाथ अभंग यांनी सभागृहास विनंती केली. त्याबाबत मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२३–२४ सालाकरीताच्या अंदाजपत्रकास तसेच सन २०२२–२३ साली झालेल्या अतिरिक्त खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यात आली. त्यानूसार खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र. ९:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि, बँकेच्या सन २०२२–२३ च्या मंजूर अंदाजपत्रकापेक्षा बाबनिहाय जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच सन २०२३–२४ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक : श्री. प्रभाकर झगडे
अनुमोदक : श्री. गोविंद तुकाराम गायकवाड
ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. १०:– अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.**

सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयावर चर्चा करण्याची परवानगी दिली आणि बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजित जाधव यांना सभासदांकडून बँकेला प्राप्त झालेल्या पत्रांचे वाचन करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे प्रत्येक पत्राचा मा. संचालक मंडळाच्या निर्देशानुसार मुद्देनिहाय खुलासा करण्याचे निर्देश दिले.

THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *

१) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. कृष्णन पी.मनी, बचत खाते क्र. १३००१०११३०३ यांच्याकडून दि. ०६.०९.२०२३ रोजीच्या प्राप्त पत्राचे वाचन केले. त्यामध्ये श्री. कृष्णन पी.मनी, यांनी बँकेत नवीन कर्मचाऱ्यांची भरती केली असुन पुर्वीच्या कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने बँकेची पत उंचावत आहे.तरी डीजीटल बँकींग व नेट बँकींगची सेवा सुरू करण्यात यावी तसेच सर्व संचालकांचे अभिनंदन करण्यात येत आहे असे नमूद केले.

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सदर पत्राबाबत श्री. कृष्णन पी.मनी यांचे प्रथम आभार व्यक्त केले व त्यांनी केलेल्या सूचनेवर बँक कार्यरत असून ती सूचना भविष्यात अंमलात येईल असे आश्वासन दिले. तसेच कोअर बँकिंगची सेवा नविन सेवा पुरवठादाराकडून सुरू झाली असुन मोबाईल बँकींग तसेच UPI आधारीत व्यवहार सेवा लवकरच सुरू करण्यात येणार आहे असे कळविण्यात आले.

२) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. आषुतोश यांच्या पत्राचे वाचन केले. सदर पत्राव्दारे, बँकेने सभासदांना नेट बँकींग, एटीएम (रोख रक्कम काढणे व भरणे, फॅमिली) ग्रूप इंश्यरंस, सिंधिया हाऊस व वाशी येथे विस्तारीत कक्ष व फेस्टीवल अॅडव्हान्स वर प्रोसेसिंग फी (व्याज) २.५०% दराने आकारण्यात यावे अशी सुचना केली.

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी तुमच्या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल असे आश्वासन दिले.

३) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. अंकूश भारगुडे यांच्या पत्राचे वाचन केले. त्यामध्ये श्री. अंकूश भारगुडे यांनी खातेदारांना झीरो बॅलंन्स खाते उघडणे,खात्यावर अमर्याद व्यवहार करण्यास मुभा असावी, निशुल्क लॉकर सुविधा देण्यात यावी, डीडी,एसएमएस, चेक बुक, पासबुक ही सविधा निशल्कअसावी,खातेदाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास रु.३०.००लाख देण्यात यावे, खातेदाराचा अपघात झाल्यास त्यास रु.१५.०० लाख रूपयाचा विमा काढण्यात यावा, बचत खात्यात जास्त जमा असल्यास त्यावर मुदत ठेवी नुसार व्याज देण्यात यावे,एटीएम भारतभर करण्याची सुविधा देण्यात यावी,हवाई जहाज दुर्घटना विमा रू.३०.०० लाख देण्यात यावा, उत्पन्नाच्या विनियोगाबाबत पान क्रमांक ७ वर १ ते ८ मध्ये दिलेल्या विनियोगाबाबत खुलासा करण्यात यावा तसेच पढरपुर व अमरनाथ यात्रा करण्याची सुविधा बँके तर्फे सार्वजनिक निधी मधुन करण्यात यावी अशी सुचना केली.

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सदर पत्राबाबत श्री. अंकूश भारगुडे यांचे प्रथम आभार व्यक्त केले व त्यांनी केलेल्या सूचनेनुसार खातेदारांना झीरो बॅलंन्स खाते उघडणे,खात्यावर अमर्याद व्यवहार करण्यास मुभा देणे, लॉकर सुविधा देणे सभासदाच्या वारसास विम्यापोटी आपण सुचविलेली रक्कम देणे आज रोजी शक्य नाही.,एसएमएस, चेक बुक, पास बुक, डीडी, NEFT या सर्व सेवा निशुल्क आहेत, बचत खात्यावर ठराविक जमा रक्कमेनंतर असलेल्या रक्कमेवर फ्लोटींग (Floating) पध्दतीने मुदत ठेवीदरानुसार व्याज देण्याची पध्दत सध्या आपल्या बँकींग प्रणालीमध्ये नसून भविष्यात याबद्दल विचार करता येईल. बँकेने दिलेले एटीएम भारतभर वापरण्याची सुविधा पुर्वीच देण्यात येत आहे. विमा रू.३०.०० लाख देणे शक्य नाही, उत्पन्नाच्या विनियोगाबाबत पान क्रमांक ७ वर १ ते ८ मध्ये दिलेल्या विनियोगाबाबत तपशिलवार खुलासा करण्यात आला. तसेच पंढरपुर व अमरनाथ यात्रा करणेची सुविधा बँके मार्फत सार्वजनिक निधी मधुन करण्यात यावा ही सुचना मान्य करणे शक्य नाही असे सुचित केले.

THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *

४) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. साजीद आयुब खातीब सभासद क्र. ४७९२ यांच्या दि. ०८.०९.२०२३ रोजीच्या पत्राचे वाचन केले. श्री साजीद खातीब यांनी आपल्या पत्राव्दारे प्रथम मा. संचालक मंडळा चे आभार मानले व त्यांनी बँकेस दिलेल्या योगदानाबाबत त्यांचे अभिनंदन केले . त्यांनी अशी सूचना केली की, बँकेतर्फे अशाच चांगल्या सेवा देण्यात याव्यात .

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सदर पत्राबाबत श्री. साजीद आयुब खातीब यांचे आभार व्यक्त केले. तसेच त्यांच्या सुचनेनुसार पुढे चांगल्या सेवा देण्याचा बँकेच्या वतीने प्रयत्न करण्यात येतील असे आश्वासन दिले.

५) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. सोपान जाधव सभासद यांच्या दि. ०८.०९.२०२३ रोजीच्या पत्राचे वाचन केले. श्री. सोपान जाधव यांनी आपल्या पत्राव्दारे अशी सूचना केली की, बॅंक स्टेटमेंट करीता आकारण्यात येणारे चार्जेस घेण्यात येऊ नयेत तसेच सभा चालू असताना स्नॅक्स देण्यात येऊ नये.

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सदर पत्राबाबत श्री. सोपान जाधव यांचे आभार व्यक्त केले. तसेच त्यांच्या निदार्शनास आणले कि, स्टेटमेंट करीता चार्जेस आकारण्यात येत नाहीत. तसेच स्नॅक्स बाबत केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले.

६) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. रमेश गावडे यांच्या पत्राचे वचन केले. श्री. श्री. रमेश गावडे यांनी आपल्या पत्राव्दारे पीएमसी बँकेतील दोन कोटी ठेवीबाबत वार्षिकसर्वसाधारण सभेत खुलासा करण्यात यावा असे कळविले आहे.

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सदर पत्राबाबत श्री .रमेश गावडे यांना असे सुचित केले की आपल्या पत्रातील विषयाबाबत वेळोवळी खुलासा करण्यात आला आहे व आता सदरची बँक ही युनिटी स्मॉल फायनान्स बँकेने घेतली असल्याने सदर ठेवीबाबत ठेवीचे दाखले बँकेच्या दप्तरी ठेवण्यात आले आहेत. सदर ठेवीवरील डीव्हीडंड प्राप्त झाला असून तो बँकेच्या चालू खात्यात जमा झाला आहे.

७) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माननीय सभासद श्री. रुपेश सदानंद आंबेकर सभासद क्र. ७२७१ यांच्या दि. १२.०९.२०२३ रोजीच्या पत्राचे वाचन केले. श्री रुपेश सदानंद आंबेकर यांनी आपल्या पत्राव्दारे अशी सूचना केली की, सभासदांना देण्यात येणाऱ्या आर्थिकमदतीमध्ये वाढ करण्यात यावी ती अशी किसभासद कालावधी १० ते १५ वर्ष १० हजार, सभासद कालावधी १५ ते २० वर्ष १२ हजार, सभासद कालावधी २० ते २५ वर्ष १५ हजार, सभासद कालावधी २५ ते ३० वर्ष २० हजार,व ३० वर्षापुढे २५ हजार करण्यात यावी, ठराविक आजारावरील उपचाराकरीता वैध्यकीय सहाय्य रु. १,५०,०००/– (रु.एकलाख पन्नास हजार ) ऐवजी ती रक्कम रु.२,००,०००/– (रु.दोन लाख ) करण्यात यावी अशी सुचना केली.

➢ बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर यांनी सदर पत्र सभागृहापुढे ठेवून सभसदांचे सदर सुचने बद्दल मत मागितले. त्यावर सभागृहामध्ये सखोल चर्चा झाली. संचालकमंडळाने सदर सुचनेनुसार केलेली वाढ करण्यास नकार दिला कारण तीन वर्षाआधीच सेवानिवृत्ती लाभ तसेच ठराविक आजाराकरीता देण्यात येणाऱ्या आर्थिकमदत रक्कमेमध्ये वाढ करण्यात आली अशी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले परंतु सभासदांनी ठराविक आजारावरील उपचाराकरीता वैध्यकीय सहाय्य रु.१,५०,०००/–(रु.एक लाख पन्नास हजार ) ऐवजी ती रक्कम रु.२,००,०००/–(रु.दोन लाख ) करण्यात यावी अशी मागणी केली. त्याकरीता सभासद कल्याणनिधीची वर्गणी



THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *

रू.१०० /– ( रु. शंभर) वरून रू.१५० /– (रु.एकशे पन्नास) करण्यात यावी असे सुचविले. सदरबाबत चर्चाकरून ठराविक आजारावरील उपचाराकरीता वैध्यकीय सहाय्य रु.१,५०,००० /– (रु.एक लाख पन्नास हजार )ऐवजी ती रक्कम रु.२,००,०००/–(रु.दोन लाख ) करण्यास व सभासद कल्याणनिधीची वर्गणी रू.१०० /– ( रु. शंभर) वरून रू.१५० /– (रु.एकशे पन्नास) करण्यास सर्वनुमते ठरविण्यात आले व त्यानुसार खलील प्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्र.१०:**

आज गुरूवार, दिनांक १४ सप्टेंबर , २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली इन्कम टॅक्स डिपार्टमेंट को–ऑप. बँक लि. या बँकेची ९७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा असा ठराव करीत आहे कि दिनांक०१.११.२०२३ पासुन ठराविक आजारावरील उपचाराकरीता वैध्यकीय सहाय्य रु.१,५०,००० /– (रु.एक लाख पन्नास हजार ) ऐवजी ती रक्कम रु.२,००,०००/–(रु.दोन लाख ) करण्यास व सभासद कल्याणनिधीची वर्गणी रू.१०० /– ( रु. शंभर) वरून रू.१५० /– (रु.एकशे पन्नास) करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक : श्री. रुपेश आंबेकर
अनुमोदक: श्री. सोपान जाधव
ठराव सर्वानुमते मंजूर

सभासद श्री. राजा गवस आणि श्री. रुपेश आंबेकर यांनी अध्यक्षांच्या परवानगीने मंचावर येऊन आपले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी काही सुचना केल्यात त्याची नोंद घेण्यात आली.

यानंतर सभेचे अध्यक्ष श्री. शीतल तळपदे यांनी असे सूचित केले की, विषय सूचूनुसार सभेचे सर्व कामकाज पार पडलेले असून मा. संचालक श्री. किरण वसंत कुबल यांना आभार प्रदर्शन करण्याची सूचना केली.

- बँकेचे मा. संचालक श्री. किरण वसंत कुबल यांनी असे नमुद केले की, सभेचे अध्यक्षस्थान श्री. शीतल तळपदे यांनी भूषविले असून त्यांचे मी बँकेच्या वतीने आभार मानतो. बँकेचे कार्याध्यक्ष श्री. रूपेश बेसेकर, उपकार्याध्यक्ष श्री. संदिप आंबोकर, व इतर संचालक यांचे आभार मानले. शामीयाना उपलब्ध करून दिल्याबद्दल आयकर प्रशासनाचे, फोटोग्राफर, बँकेचे कर्मचारी यांचे आभार मानले. शेवटी सभेसमोरील सर्व विषय संपल्याने उपस्थित सर्व सभासदांच्या सहयोगाबद्दल आणि सभेला उपस्थित राहून सभेत भाग घेतल्याबद्दल, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जाधव साहेब व त्यांचे सहकारी यांनी खुप मेहनत घेतली त्याबाबत त्यांचे आभार मानले. त्यानंतर सभेच्या अध्यक्षांच्या परवानगीने राष्ट्रगीत गाऊन सभेची सांगता करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| मुंबई | अजित विठ्ठल जाधव | रूपेश नामदेवराव बेसेकर |
| दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ | मुख्य कार्यकारी अधिकारी | कार्यध्यक्ष |

************

THE INCOME-TAX DEPT. CO-OP. BANK LTD. SEAL * MUMBAI *